REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 3 | DECEMBER - 2018

वयानुरूप प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीमध्ये येणाऱ्या समस्यांचा अभ्यास

श्री. राजीव पाटोळे

१. प्रस्तावना :

भारत सरकारने १ एप्रिल २०१० पासून बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम , २००९ जम्मू काश्मीर वगळता संपूर्ण देशभर लागू केला आहे. या कायद्याने मुलांना शिक्षणाचा हक्क प्राप्त झाला आहे. कायद्यातील कलम ४ नुसार शाळाबाह्य तसेच शाळा सोडून गेलेल्या मुलांना वयानुरूप समकक्ष वर्गात प्रवेश द्यावयाचा आहे. अशा विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यानंतर वर्गातील नियमित विद्यार्थ्यांबरोबर त्यांची अध्ययन पातळी आणण्यासाठी विशेष शिक्षणाची गरज आहे.

वयानुरूप समकक्ष वर्गात प्रवेश घेतलेल्या विशेष शिक्षणासाठी परिषदेने पाठ्यक्रम विकसित केला आहे. यात प्रामुख्याने भाषा, गणित या विषयांचा समावेश केलेला आहे. हा पाठ्यक्रम विकसित करताना वाचन, लेखन, संख्याज्ञान व संख्यांवरील क्रिया या मूलभूत कौशल्यांवर भर दिला असून हा मुलांच्या अनुभव विश्वाशी सांगड घालणारा आहे.

२. **संबधित साहित्याचा व गतसंशोधनाचा आढावा :** सक्तीचे व मोफत शिक्षण अधिनियम यावर फारसे साहित्य उपलब्ध नसल्याने संशोधकाने या विषयाशी संबंधित वृत्तपत्रातील लेख , मासिकामधील लेख , इंटरनेटपरील साहित्य यांचा आढावा घेतलेला आहे.

३. **संशोधनाची गरज :** शाळाभेटीला गेल्यानंतर संशोधकाला अनेक शाळांमध्ये वयानुरूप प्रवेश घेतलेली मुले आढळली. त्यांना प्रवेश देण्यापासून ते त्यांना इतर सर्वसामान्य मुलांपर्यंत आणण्यामध्ये अनेक अडचणी शिक्षकांना येत असल्याचे जाणवले. त्यामुळे या मुलांवर संशोधन करण्याचे संशोधिकेने ठरविले.

४. समस्या विधान :

वयानुरूप प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीमध्ये येणाऱ्या समस्यांचा अभ्यास.

५. कार्यात्मक व्याख्या :

१. वयानुरूप प्रवेश घेतलेले विद्यार्थी : शाळा मध्येच सोडून गेलेले किंवा शाळेत अजिबात न गेलेले विद्यार्थी शाळेत प्रवेश घेतात असे विद्यार्थी

२. शैक्षणिक संपादणूक : वयानुरूप प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती

६. संशोधनाची उद्दिष्टे :

१. वयानुरूप प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे.
२. वयानुरूप प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीमध्ये येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.
३. वयानुरूप प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीमध्ये वाढ करण्यासाठी कृतिकार्यक्रम विकसित करणे.

LBP PUBLICATION

७. संशोधनाचे महत्त्व :

१. सदर संशोधनाचा उपयोग शिक्षकांना वयानुरूप प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीमध्ये येणाऱ्या समस्यांची माहिती होण्यासाठी होईल.

२. सदर संशोधनाचा उपयोग विद्या परिषद, पुणे यांना वयानुरूप प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रम तयार करताना होईल.

३. सदर संशोधनाचा उपयोग शासनाला वयानुरूप प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी ध्येयधोरणे तयार करताना होईल.

४. सदर संशोधनाचा उपयोग जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेतील अधिकाऱ्यांना शाळा भेटीच्या वेळी शिक्षकांना मार्गदर्शन करण्यासाठी होईल.

८.संशोधनाची व्याप्ती :-

१. सदर संशोधनात सातारा जिल्ह्यातील कराड व माण तालुक्यांचा विचार केला आहे.

२. सदर संशोधनात सातारा जिल्ह्यातील कराड व माण तालुक्यांमधील प्राथमिक शाळांचा विचार केला जाणार आहे.

३. सदर संशोधनात वयानुरूप प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीमध्ये येणाऱ्या समस्यांचा विचार केला जाणार आहे.

९. संशोधन मर्यादा :

१. सदर संशोधनात सातारा जिल्ह्यातील कराड व माण तालुक्यांव्यतिरिक्त इतर तालुक्यांचा विचार केला नाही.

२. सदर संशोधनात सातारा जिल्ह्यातील कराड व माण तालुक्यांमधील प्राथमिक शाळाव्यतिरिक्त इतर शाळांचा विचार केला जाणार नाही

३. सदर संशोधनात वयानुरूप प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीमध्ये येणाऱ्या समस्यांव्यतिरिक्त इतर समस्यांचा विचार केला जाणार नाही.

१०. संशोधन पध्दती :-

संशोधन समस्येचे स्वरुप पाहता संशोधकाने सर्वेक्षण पध्दतीची निवड केली.

नमुना निवड टप्पे :-

१) प्रस्तुत संशोधनासाठी सातारा जिल्ह्यातील कराड व माण तालुक्यातील प्रत्येकी २५ शाळांची निवड यादृच्छिक नमुना पध्दतीने पहिल्या टप्प्यावर केली.

२) दुसऱ्या टप्प्यावर संबंधित निवड केलेल्या शाळांमधील प्रत्येक शाळेतील एका शिक्षकांची यादृच्छिक नमुना पध्दतीने निवड केली.

३) तिसऱ्या टप्प्यांवर संबंधित निवड केलेल्या शाळांमधील वयानुरूप प्रवेशित १०० विद्यार्थ्यांची नमुना म्हणून यादृच्छिक पध्दतीने निवड केली.

८. संशोधन साधन निश्चिती व निर्मिती :-

संशोधकाने गुणात्मक माहिती संकलनासाठी प्रश्नावली, संपादणूक चाचणी या संशोधन साधनांची निश्चिती केली.

माहिती विश्लेषण व अर्थनिर्वचन :

संशोधकाने शिक्षक प्रश्नावली आणि विद्यार्थी संपादणूक चाचणी यांच्या साहाय्याने माहिती संकलित केली. या संकलित माहितीचे विश्लेषण शेकडेवारी या साधनाच्या मदतीने केले.

निष्कर्ष :

१. भारत सरकारच्या बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ च्या अंमलबजावणीबाबत शिक्षकांमध्ये मतभिन्नता आढळते.

२. वयानुरूप समकक्ष वर्गात प्रवेश कायद्यातील कोणत्या कलमानुसार द्यावयाचे आहे याबाबतीत शिक्षकांमध्ये निश्चितता नाही असे लक्षात येते.

३. वयानुरूप प्रवेशित विद्यार्थ्यांना नियमित विद्यार्थ्यांबरोबर त्यांची अध्ययन पातळी आणण्यासाठी विशेष शिक्षण , पर्यायी शिक्षण आणि नियमित शिक्षण देण्याची गरज आहे असे शिक्षकांना वाटते.

४. वयानुरूप मुलांच्या शिक्षणासाठी पाठ्यक्रम विद्यापरिषदेने विकसित केलेले आहे याचे ज्ञान खूपच कमी शिक्षकांना आहे.

५. वयानुरूप प्रवेश मुलांच्या प्रवेशाबाबत त्याचा दाखला नसल्याने, तसेच पालकांची अनास्था आणि मुख्याध्यापकांमुळे अडचणी येतात.

६. बहुतांश शिक्षकांच्या मते वयानुरूप विद्यार्थी गोळा करताना अडचणी येतात .

LBP PUBLICATION

७. वयानुरूप प्रवेश मुलांच्या प्रवेशाबाबतीत शाळा व्यवस्थापन, मुख्याध्यापक , पालक आणि विद्यार्थी यांचे सहकार्य मिळते.

८. मुले कामाला जाणे , भावंडांना सांभाळावे लागणे , शाळेची गोडी नसणे अशा विविध कारणांमुळे वयानुरूप प्रवेशित विद्यार्थी शाळेत दररोज उपस्थित राहत नाहीत.

९. बहुतांश विद्यार्थ्यांना पालकांकडून प्रोत्साहन मिळत नाही. बहुतांश शिक्षक विद्यार्थ्यांच्या शिक्षणासंबंधी पालकांचे मतपरिवर्तन करतात ही चांगली बाब आहे.

१०. विद्यार्थ्यांना शिकविताना विद्यार्थी अभ्यास करत नाहीत , अध्यापनाकडे लक्ष देत नाहीत , ही मुले अध्ययन-अध्यापनात सहभागी होत नाहीत अशा अडचणी येतात

११. बहुतांश शिक्षक विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असणाऱ्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देतात.

१२. बहुतांश शिक्षकांना विद्यार्थ्यांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही.

१३. वयानुरूप मुलांच्या शिक्षणासाठी पाठ्यक्रमात भाषा, गणित, इंग्रजी या विषयाचा समावेश आहे हे खूपच कमी शिक्षकांना माहित आहे.

१४. शिक्षकांना वयानुरूप विद्यार्थ्यांना इंग्रजी आणि गणित विषय शिकविताना जास्त अडचणी येतात.

१५. वयानुरूप प्रवेश विद्यार्थ्यांना वर्गांमध्ये सामाजिक समायोजन करताना अडचणी येतात. वयानुरूप विद्यार्थ्यांचे व्यावहारिक गणिती ज्ञान थोड्याफार प्रमाणात चांगले असते.

१६. वयानुरूप प्रवेश विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याच्या पध्दतीबाबत शिक्षकांमध्ये मतभिन्नता आढळून आले.

१७. शिक्षक वयानुरूप प्रवेश विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी उपचारात्मक अध्यापन, शैक्षणिक साहित्यांचा वापर करून अध्यापन, कलागुणदर्शन कार्यक्रम राबवतात.

विद्यार्थी संपादणूक चाचणीवरून आलेले निष्कर्ष :

१. फक्त १२ विद्यार्थ्यांना मराठी गणित आणि इंग्रजी विषयात मिळून ५० टक्क्यांपेक्षा जास्त गुण आहेत.

२. मराठीमध्ये तीन विद्यार्थ्यांना ०गुण मिळालेले आहेत.

३. गणितामध्ये तीन विद्यार्थ्यांना ०गुण मिळालेले आहेत.

४. इंग्रजीमध्ये १२ विद्यार्थ्यांना ० गुण मिळालेले आहेत.

५. मराठी आणि इंग्रजी विषयापेक्षा गणितामध्ये विद्यार्थ्यांची प्रगती बरी आहे.

६. मराठीमध्ये विद्यार्थ्यांना स्वत: विचार करून आवडत्या विषयावर लेखन करता आलेले नाही.

७. बहुतांश विद्यार्थ्यांना मराठी आणि इंग्रजी वाचन करता आलेले नाही.

८. बहुतांश विद्यार्थ्यांना गणितातील संख्या ओळखता आलेले नाही.

९. विद्यार्थ्यांना शाब्दिक उदाहरणे सोडवता आलेली नाहीत.

१०. बहुतांश विद्यार्थ्यांची गुणाकाराची आणि भागाकाराची उदाहरणे सोडवता आलेली नाहीत.

शिफारशी :

अ) क्षेत्रीय अधिकारी यांच्यासंबंधी शिफारशी :-

१) क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी शाळा भेटीला गेल्यावर शाळा तपासणी बरोबर वयानुरूप प्रवेशित विद्यार्थ्यांना योग्य असे मार्गदर्शन करावे.

२) क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी शिक्षकांनी वयानुरूप प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रगतीच्या नोंदी शासनाने निर्धारित केलेल्या पध्दतीनुसार होतात की नाही याची खात्री करावी.

३) शिक्षकांच्या नोंदी शासनाने निर्धारित केलेल्या पध्दतीनुसार होत नसल्यास त्यांसंबंधी त्यासंबंधित शिक्षकांना आवश्यकतेनुसार मार्गदर्शन करावे.

४) वयानुरूप प्रवेशित विद्यार्थ्यांच्या कृतीशी शिक्षकांनी केलेल्या नोंदी जुळतात की नाही याचा पडताळा क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी वेळोवेळी घ्यावा.

५) वयानुरूप प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणात्मक दर्जा सुधारण्यासाठी मुख्याध्यापक व शिक्षक यांनी केलेले कामकाज उत्तम आढळल्यास त्यांना प्रेरणा देण्यासाठी स्वत:च्या स्तरावरुन त्यांचा गौरव करावा.

६) शिक्षक व मुख्याध्यापक यांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी वरिष्ठ पातळीवरुन प्रयत्न करावेत.

७) शिक्षकांच्या कामाचे व वयानुरूप प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी कलेल्या अध्यापनाचे अनुधावन गरजेनुरुप सतत वर्षभर करावे.

ब) मुख्याध्यापक यांच्यासंबंधी शिफारशी :-

१) मुख्याध्यापकांना गरजेनुरुप शाळा स्तरावर शिक्षकांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी कृतीशील पुढाकार घ्यावा.

२) शिक्षकांनी वयानुरूप प्रवेशित विद्यार्थ्यांसंबंधी लक्षात आणून दिलेल्या बाबींच्या पाठपुरावा करावा.

LBP PUBLICATION

३) मुख्याध्यापकांनी वयानुरूप प्रवेशित विद्यार्थ्यांच्या पालकांशी सुसंवाद साधावा. तसेच वयानुरूप विद्यार्थ्यांच्या प्रगतीविषयी पालकांशी चर्चा करावी.

४) वयानुरूप प्रवेशित विद्यार्थ्यांच्या सर्व कृतींवर मुख्याध्यापकांनी लक्ष ठेवावे.

५) वयानुरूप प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या वयानुरूप स्पर्धा ठेवाव्यात व स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी योग्य कार्यक्रम ठेवून त्यांचा गौरव करावा.

६) वयानुरूप विद्यार्थ्यांच्या संदर्भात शासनाच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांकडून योग्य मार्गदर्शन घ्यावे.

७) मुख्याध्यापकांची शासन स्तरावरुन आलेल्या सर्व योजनांचा पाठपुरावा करावा.

क) शिक्षकांसबंधी शिफारशी :-

१) शिक्षकांना वयानुरूप प्रवेशित विद्यार्थी वर्गात लक्षात येताच तात्काळ त्यांच्यासंबंधी मुख्याध्यापकांच्या लक्षात आणून द्यावे.

२) शिक्षकांनी शोधपत्रिकेवरुन पात्र झालेल्या वयानुरूप प्रवेशित विद्यार्थ्यांसंबंधी शाळा स्तरावरुन पाठपुरावा करावा.

३) शिक्षकांनी शासनाकडून मिळालेल्या साधनांचा वापर करुन वयानुरूप प्रवेशित विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढवावी.

४) वयानुरूप प्रवेशित विद्यार्थ्यांसंबंधी असलेल्या उद्‌बोधनपर शिबिरास शिक्षकांनी हजर रहावे.

५) वयानुरूप प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी शिक्षकांनी पालकांचा सहभाग घ्यावा.

६) वयानुरूप प्रवेशित विद्यार्थ्यांच्या पालकांचे समुपदेशन करावे.

७) शिक्षकांनी वयानुरूप प्रवेशित विद्यार्थ्यांचे सामाजिकीकरण करण्यासाठी प्रयत्न करावेत.

८) शिक्षकांनी वयानुरूप प्रवेशित विद्यार्थ्यांच्या चांगल्या गुणास वाव द्यावा.

संदर्भ सूची :

1. बालकाचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ नियम क्रमांक ३५

2. वयानुरूप समकक्ष वर्गात प्रवेश घेतलेल्या मुलांच्या विशेष शिक्षणासाठी शिक्षक मार्गदर्शिका. (२०१२). महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे.

3. Mission, New Delhi. (1999).Reaching *the unreached: innovative strategies for providing out of school children with access to basic education*. New Delhi: National Literacy Mission. 102 p.

4. साधना-वंचितांचे शिक्षण विशेषांकक साने गुरूजी स्मृती विशेषांक (२००५), पुणे.

5. मुळे रा. शं आणि उमाठे वि. तु. (१९९८), शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे. विद्या प्रकाशन, औरंगाबाद.

6. Best J.W. (2005). Research In Education. 9th Edition. Prentice Hall of India. New Delhi

LBP PUBLICATION